# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबीर
# स्थळ:-- भिंदोन. ता. व जि. औरंगाबाद.
## ( शैक्षणिक वर्ष २०२२ -२०२३ )
## दि.१८ जानेवारी २०२३ ते २४ जानेवारी २०२३ .

---

जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला कला महाविद्यालय गारखेडा परिसर औरंगाबाद. येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ या वर्षाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय निवासी शिबीर **"आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत युवकांचा ध्यास ग्राम – शहर विकास" दि.१८ जानेवारी २०२३ ते २४ जानेवारी २०२३** या दरम्यान मौजे **भिंदोन**, ता व जि औरंगाबाद या ठिकाणी घेण्यात आले.

**भिंदोन** येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला कला महाविद्यालयाद्वारे घेण्यात आलेल्या विशेष श्रम संस्कार शिबीर महाविद्यालययाचे प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार व सहकार्यक्रमाधिकारी डॉ.वनिता साबळे तसेच डॉ. साईनाथ बनसोडे, प्रा. गजानन फुलसावंगे यांनी यशस्वीपणे पूर्ण केले.

**विशेष श्रम संस्कार शिबीराचे उदघाटन -**

मौजे भिंदोन येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन दि. १८ जानेवारी २०२३ रोजी मॉडर्न कन्या विद्यालयाचे शिक्षक श्री. गुलाब शेख यांच्या हस्ते झाले. उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामकिशन दहिफळे, प्रमुख पाहुणे म्हणून लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लियाकत शेख, जिल्हा परिषद शाळेचे मुख्यध्यापक गणेश नलावडे, कुरणपिंपरीचे उपसरपंच मुजमील पटेल, प्रा. जितेंद्र शेजवळ, श्री राजेंद्र ठुबे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. पल्लवी भावसार, उपस्थित होते.

प्रा. जितेंद्र शेजवळ, डॉ. विठ्ठलसिंग घुनावत, डॉ.अनिस मिर्झा, प्रा. साईनाथ बनसोडे, डॉ. अ. समद शेख, डॉ. नरसिंग देशमुख, डॉ. वनिता साबळे, डॉ. अबुल हसीब सिद्दीकी, प्रा. प्रकाश काळवणे, प्रा. गजानन फुलसावंगे श्रीमती. सय्यदा सरवतफरहीन, व समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते.

याप्रसंगी भिंदोन येथील प्रशासक-विस्तार अधिकारी मा. श्री. विजायकुमार पंडित व ग्रामसेवक मा. श्री. उदे यांनीही राष्ट्रीय सेवा योजनेतील कार्यासाठी त्यांनी गावाच्या सहकार्याचा तुम्हांस पूर्णपणे लाभ मिळेल असे सांगितले. रासेयोच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, आरोग्य संवर्धन, ग्रामस्वच्छता, वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, बेटी बचाव, महिला सबलीकरणासाठी प्रयत्न करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले. गावात परिवर्तन करण्याचे कार्य युवती ह्या चांगल्या प्रकारे करू शकतात. पुढील सात दिवसात गावात बदल घडवून आणण्याचे कार्य तुम्ही करावे व त्यासाठी तुम्हाला गावकरी सहकार्य करतीलच असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

या शिबिराचे उदघाटक म्हणून या प्रसंगी मॉडर्न कन्या विद्यालयाचे शिक्षक श्री गुलाब शेख यांनी आपल्या भाषणात म्हटले की, एन.एस.एस.च्या माध्यमातून राष्टीय एकात्मता जोपासली जाते.त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व प्रतिपादित केले. युवकांमधे सामाजिक संस्कार, सेवाभाव रुजविण्यासाठी एन. एस. एस. उपयोगाचे ठरते. मुलगी शिकली तर

ती परिवाराचा विकास घडवून आणू शकते. मुलगी ही देशाच्या विकासातील प्रथम पायरी आहे. युवतींच्या माध्यमातून देश उन्नतीच्या उंच शिखरावर पोहचू शकतो. मुलींच्या शिक्षणाबरोबरच पर्यावरण संवर्धन, गावातील स्वच्छता, महिलांच्या सबलीकरणाच्या, जलसंवर्धन, वृक्षारोपण,सारख्या कार्यक्रमातून देशाची प्रगती होऊ शकते.युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास ह्या उद्देशाने युवकांनी कामे केली तर त्यातूनच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट साध्य होईल.

अध्यक्षीय समारोप जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला कला महाविद्यालययाचे प्राचार्य डॉ.रामकिशन दहिफळे यांनी आपल्या भाषणातून शिबिराच्या अनुषंगाने सर्व स्वयंसेविकांनी भिंदोन गावात श्रमदान करून व जागृती करण्याचे आवाहन केले. एन.एस.एस. चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वयंसेविकांना प्रोत्साहन दिले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविकात शिबीर काळातील कार्यक्रमाची माहिती दिली व त्यात शिबिरात सकाळी ७ वाजेपासून तर रात्री १० वाजेपर्यंतच्या उपक्रमाची रूपरेषा सांगितली. उदा. श्रमदान, बौद्धिक सत्र, विविध स्पर्धा इत्यादी विषय माहिती दिली. या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.वनिता साबळे यांनी केले तर आभार प्रदर्शनाचे कार्य प्रा. डॉ. साईनाथ बनसोडे यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील महाविद्यालययाचे प्राचार्य डॉ.रामकिशन दहिफळे, प्रा. जितेंद्र शेजवळ, डॉ. विठ्ठलसिंग घुनावत, डॉ. अनिस मिर्झा, प्रा. साईनाथ बनसोडे, डॉ. अ. समद शेख, डॉ. पल्लवी भावसार, डॉ.वनिता साबळे, डॉ.नरसिंग देशमुख, डॉ. अबुल हसीब सिद्दीकी, प्रा. प्रकाश काळवणे, प्रा. गजानन फुलसावंगे, ग्रंथपाल सयदा सरवत फरहीन, भिंदोनमधील प्रशासक, जि.प. मुख्याध्यापक श्री. गणेश नलावडे, शिक्षिका श्रीमती राऊत, व त्यांचे सहकारी आणि समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिबीरातील श्रमदान कार्य व विविध उपक्रम :**

"**आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास**" या ब्रीद वाक्याखाली आयोजित जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला कला महाविद्यालयाचे मौजे भिंदोन येथील विशेष श्रम संस्कार शिबीरातील महाविद्यालयातील स्वयंसेविकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन उत्कृष्टपणे श्रमदानाचे कार्य पार पाडले आहे.

१) ग्रामस्वच्छता.
२) वृक्षारोपण.
३) पूर्वी लावलेल्या झाडांना आळे व पाणी.
४) नाल्यांची सफाई.
५) गाजरगवत निर्मुलन.
६) मंदिर परिसरात स्वच्छता.
७) आपत्ती व्यवस्थापन.
८) बेटी बचाव.
९) महिला सबलीकरण.
१०) व्यसनमुक्ती व जनजागृती.
११) प्रबोधनात्मक सांस्कृतीक कार्यक्रम.
१२) अंधश्रद्धा निर्मुलन.
१३) प्रगल्भ व्याख्याने.

१४) व्यक्तिमत्व विकास.
१५) बौद्धिक सत्र / विविध स्पर्धा.
१६) क्रीडा विषयक मैदानी स्पर्धा.
१७) मान्यवर विद्वानांच्या भेटी.
१८) शिबीर समारोप.

**१) ग्रामस्वच्छता :-**

शिबीरार्थी स्वयंसेविकांनी मौजे भिंदोन येथील ग्रामपंचायत परिसरातील घाण व त्यात कचरा, प्लास्टिक पिशव्या, काचेचे तुकडे वाळलेली झाडांची पाने इत्यादी स्वच्छता कार्यकाळात साफ केले.तो सर्व कचरा एका जागी जमा करून नष्ट करण्यात आला.त्याचा फायदा असा झाला की परिसर स्वच्छ झाल्याने डास व कीटकांचा नायनाट झाला. स्वयंसेविकांनी संपूर्ण भिंदोन गावामध्ये या विशेष शिबीर कालावधीत गावातील महिला, माता-भगिनी, पुरुष मंडळींनी स्वतः स्वच्छता मोहिमेत सहभाग घेऊन ग्रामस्वच्छतेचे महत्व आचरणात आणले. या गावात ग्रामस्वच्छता दिंडी काढून, ग्रामस्थांना प्रेरणा देऊन राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश स्पष्ट केला.

**२) वृक्षारोपण :-**

वृक्षारोपण करण्यासाठी भिंदोन येथील शालेय परिसरात ग्रामस्थांच्या मदतीने शिबीरार्थी स्वयंसेविकांनी २ बाय २ फुट वा दीड फुट खोल या आकाराची खड्डे दि.२० /०१ /२०२३ या दिवशी खड्डे खोदले व त्यामध्ये दि.२१/०१/२०२२ रोजी सर्व स्वयंसेविकांनी अशोकाची, विद्येची, गुलमोहराची, जास्वंदाची, झाडे लावण्यात आली. त्याचबरोबर ग्रामस्थांना त्या झाडांचे संगोपन करण्याचे व पावसाळ्यात त्याठिकाणी आणखी झाडे लावण्याची विनंती करण्यात आली.

**३) पूर्वी लावलेल्या झाडांना आळे व पाणी :-**

भिंदोन च्या शालेय परिसरात बऱ्याच प्रमाणात झाडांची रोपे लावलेली होती. परंतु ती रोपे अस्त-व्यस्त झाली होती. पाणी टाकण्यासाठी आळे नव्हते. त्यामुळे झाडांच्या रोपांना पाणी टाकता येत नव्हते. त्यामुळे शिबीरार्थी स्वयंसेविकांनी व महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार, डॉ वनिता साबळे, प्रा. गजानन फुलसावंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अस्त-व्यस्त झालेली आळे व्यवस्थित करून त्या झाडांना पाणी घातले व गावकऱ्यांना त्या झाडांना नियमित पाणी देण्यास सांगण्यात आले.

**४) नाल्यांची सफाई :-**

गावामध्ये काही ठिकाणी नाले व्यवस्थीत नसल्याचे दिसून आले. बऱ्याच नाल्यांमध्ये कचरा पडलेला होता. तो कचरा स्वयंसेविकांनी काढून टाकला.नाल्याच्या काठावरचे गवतही साफ केले. त्यामुळे गटारे स्वच्छ झाले परिणामी डासांचे प्रमाण कमी दिसून आले आणि त्यामुळे रोगराइला आळा बसला.

**५) गाजरगवत निर्मुलन :-**

भिंदोन येथे असलेल्या परिसरात गाजरगवत व छोटी झुडपे होती शिबिरार्थींनी शिबीराच्या दुसऱ्याच दिवशी परिसरातील सर्व गाजरगवत कापून ते नष्ट केले. त्याचबरोबर गावात असलेल्या वस्तीतील भागात स्वच्छता केली आणि पुन्हा गाजरगवत होणार नाही या विषयी जनजागृती करण्यात आली. परिणामी तेथे डासांचे प्रमाण कमी दिसून आले.

**६) मंदिराच्या परिसरातील स्वच्छता :-**

भिंदोन गावाच्या मंदीर परिसरामध्ये बऱ्याच प्रमाणात प्लास्टिक, पिशव्या, कचरा, पालापाचोळा इत्यादी प्रकारची घाण होती. स्वयंसेविकांनी सर्व घाण नष्ट केली. मंदीर परिसरात स्वच्छता केल्यामुळे गावकऱ्यामध्ये आनंदाचे वातावरण होते.

**७) आपत्ती व्यवस्थापन** :-

आपत्ती व्यवस्थापनमध्ये पाण्याचे दैनंदिन नियोजन, सांडपाण्याचा उपयोग वृक्षांसाठी करावा व शोषखड्डयाविषयी जनजागृती करण्यात आली.

**८) बेटी बचाव** :-

एन.एस.एस.च्या शिबिरार्थी विद्यार्थीनींनी गावामध्ये घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले व गावातील काही घरांचे प्रश्नावलीतून मुलींच्या शिक्षण विषयक विचार ऐकून घेतले. मुलींचा जन्मदर वाढण्यासाठी लोकांमध्ये फेरीच्या माध्यमातून, पथनाटयाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. मुलींची समाजातील गरज समजावण्यात आली.

**९) महिला सबलीकरण** :-

शिबीरार्थी स्वयंसेविकांनी महिला सबलीकरणासाठी भिंदोन गावात घरा-घरामध्ये जाऊन महिलांच्या सबलीकरणासाठी महिलांमध्ये आपल्या हक्कांसाठी जाणीव-जागृती करण्याचे काम या सात दिवसाच्या माध्यमातून केले. त्यामध्ये त्यांनी गावात प्रभातफेरी, पथनाट्य, घोष वाक्यांच्या माध्यमातून महिलांना जागृत करण्याचा प्रयत्न केला.महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कार्य या सात दिवसीय विशेष शिबीराच्यामाध्यमातून करण्याचे कार्य झाले.

**१०) प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम** :-

व्यसनमुक्ती, कुटुंबनियोजन, स्त्रीभृणहत्या, बेटीबचाव, महिलासबलीकरण, भ्रष्ट्राचार निर्मुलन, पाणीप्रश्न, महागाई, लोकसंख्यावाढ वाढती गुन्हेगारी, बलात्कार, स्त्रीयांचेशोषण, इत्यादी महाभयंकर प्रश्नांवर, समस्यावर, शिबीरार्थी विद्यार्थीनींनी गीतांच्या पोवाड्याच्या माध्यमातून, निबंध स्पर्धेच्या माध्यमातून वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून कवितेच्या माध्यमातून, चारोळी व शेरोशायरीतून यांविषयी जाणीव-जागृतीचे कार्य या सप्ताहात केले व त्यातून समाजप्रबोधन घडवून आणण्याचे महान कार्य झाले.

**११) अंगणवाडी भेट**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांनी भिंदोन येथील अंगणवाडीला भेट दिली व अंगणवाडी सेविका ताई तसेच मदतनीस यांच्या कडून अंगणवाडी चे उद्दिष्ट व कार्य समजून घेतले व बाल गोपळसोबत चर्चा केली.

**तज्ञांची प्रगल्भ व्याख्याने** :-

दि.१८/०१/२०२३ ते दि.२४/०१/२०२३ या विशेष शिबीराच्या काळात दररोज विविध तज्ञांची वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने आयोजित केली होती. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**१) व्याख्याते :-डॉ.संतोष काकडे** ( लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद.)
**विषय :-व्यसन मुक्ती व अंधश्रद्धा निर्मूलन** :-

दि.१९/०१/२०२३ या दिवशी लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद येथील लोकप्रशासन विषयाचे प्राध्यापक डॉ. संतोष काकडे यांनी व्यसन मुक्ती व अंधश्रद्धा निर्मूलन वर आपले व्याख्यान दिले. त्यात त्यांनी व्यसना मुळे माणूस आयुष्यात मागे पडतो याविषयी स्वयंसेविकांना तसेच भिंदोन येथील ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. कोणत्याही गोष्टीचे व्यसन हे फार वाईट असते हे सुद्धा त्यांनी सांगितले, त्यासाठी त्यांनी मोबाइल, टी.व्ही. दारू,

सिगरेट ह्याची उदाहरणे त्यांनी दिलीत. पुढे त्यांनी असेही सांगितले की एन.एस.एस. च्या माध्यमातूनही व्यसन मुक्ती साठी आपण जनजागृती करू शकतो. अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य एन.एस.एस.च्या माध्यमातून उत्कृष्टपणे पार पाडता येते. उदा. पथनाट्य, प्रभातफेरी, जनजागृती, व्याख्यानातून इत्यादी. आजच्या प्रगत युगातही आज आपणास दाभोळकर व गोविंद पानसरे यासारख्या अंधश्रद्धा निर्मुलन करणारांचा बळी आज या व्यवस्थेने घेतलेले आपणास दिसून येते. आज खऱ्या अर्थाने आज आपणास छ.शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, शिक्षणमहर्षी सावित्रीबाई, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यांसारख्या महान विचारवंतांच्या विचारांची आज आपणास खरी गरज असण्याचे त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले. यावेळी सत्राचे अध्यक्ष प्रा.जितेंद्र शेजवळ होते. प्रा. रामकिशन दहिफळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. पल्लवी भावसार, डॉ. वनिता साबळे, प्रा. साईनाथ बनसोडे, प्रा. गजानन फुलसावंगे व जि. प. भिंदोन शिक्षक व शिक्षिका आणि भिंदोन गावातील महिला उपस्थित होत्या.

**२) व्याख्याते :-श्री विश्वनाथ कस्तुरे** ( युनिसेफ सदस्य.)

**विषय :-वृक्षारोपण :-**

दि. २०/०१/२०२३ या दिवशी युनिसेफ(युनाटेड नेशन्स चिलड्रेन्स फंड )चे सदस्य श्री विश्वनाथ कस्तुरे सर यांनी आरोग्य ,स्वच्छता,व योग्य पद्धतीने वृक्षारोपण कसे करायचे याचे मार्गदर्शन केले .त्यात त्यांनी विद्यार्थ्यानी आपले आरोग्य कसे सांभाळायचे हयाबद्दल काही टिप्स सांगितल्या . आपले हात कायम स्वच्छ ठेवावे हे सांगितले. त्यासाठी त्यांनी खूप सुंदर गाणे म्हटले व ॲक्शन करून दाखविली .

अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य एन.एस.एस.च्या माध्यमातून उत्कृष्टपणे पार पाडता येते.उदा.पथनाट्य,प्रभातफेरी,जनजागृती,व्याख्यानातून इत्यादी.आजच्या प्रगत युगातही आज आपणास दाभोळकर व गोविंद पानसरे यासारख्या अंधश्रद्धा निर्मुलन करणारांचा बळी आज या व्यवस्थेने घेतलेले आपणास दिसून येते.आज खऱ्या अर्थाने आज आपणास छ.शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले, शिक्षणमहर्षी सावित्रीबाई,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,गाडगेबाबा यांसारख्या महान विचारवंतांच्या विचारांची आज आपणास खरी गरज असण्याचे त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले... यावेळी सत्राचे अध्यक्ष प्रा .जितेंद्र शेजवळ होते . प्रा.रामकिशन दहिफळे,कार्यक्रमाधिकारी डॉ. पल्लवी भावसार , डॉ.वनिता साबळे ,प्रा.साईनाथ बनसोडे, प्रा. गजानन फुलसावंगे व जि.प.भिंदोन शिक्षक व शिक्षिका आणि भिंदोन गावातील महिला उपस्थित होत्या

**३) व्याख्यात्या :- श्रीमती मीनाक्षी राऊत (**शिक्षिका जि. प्र. उ. प्रा. शाळा,भिंदोन,औरंगाबाद)

**विषय :- आरोग्यदायी जीवना साठी योग व आहार**

दि.२०/०१/२०२३रोजी जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला कला महाविद्यालय व एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने भिंदोन येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या द्वितीय बौद्धिक सत्रामध्ये जि . प्र . उ . प्रा . शाळेच्या शिक्षिका श्रीमती मीनाक्षी राऊत यांनी आपल्या व्याख्यानातून आरोग्यदायी जीवना साठी योग व आहार कसा असावा ही सांगितले. विद्यार्थिनी नि आपली काम करण्याची क्षमता कशी वाढवावी यासाठी काही टिप्स सांगितल्या . योग हा आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका करतो कारण योगा मुळे नुसते शारीरिक आरोग्यात सुधारणा होत नाही तर मानसिक आरोग्यही चांगले राहत असते,असे त्यांनी सांगितले . योगा सोबत आपला आहार

कसा असावा हयबद्दल राऊत मॅडम ने विद्यार्थिनी सोबत चर्चा केली . फास्टफूड जास्त खाऊ नये त्यात जास्त प्रथिने नसतात, घरी तयार केलेले ताजे अन्न खावे तसेच विटमिन युक्त पदार्थ खावे असे त्यांनी सांगितले . यासर्वा बरोबर सकारात्मक विचार कायम असावे व कोणतेही काम जास्त तणाव न घेता करावे असेही त्यांनी सांगितले . .यावेळी कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु.धनश्री सिदवाडकर हिने केले तर आभार प्रदर्शन कु.विभाली भावसार हिने केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अनिस मिर्झा यांनी अध्यक्षीय समारोप केला.यावेळी, कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार, डॉ.वनिता साबळे ,प्रा. गजानन फुलसावंगे डॉ.अ.समद शेख, जि.प.प्रा.शाळेचे शिक्षक व शिक्षिका व विद्यार्थिनी आणि गावकरी उपस्थित होते.

**४) व्याख्याते :- प्रा डॉ. प्राजकती वाघ** (राजश्री शाहू महाविद्यालय, वाळूज , औरंगाबाद )

**विषय:- महिला सबलीकरण :-**

दि.२१/०१/२०२३ या दिवशी राजश्री शाहू महाविद्यालय, वाळूज , औरंगाबाद येथील प्रा डॉ. प्राजकती वाघ यांनी महिला सबलीकरण विषयी आपले व्याख्यान देतांना असे सांगितले की आज महिला ह्या प्रत्येक क्षेत्रा मध्ये आपले कर्तुत्व सिद्ध करत आहेत . सावित्री बाई फुले यांनी महिलासाठी शिक्षणाची द्वारे खुले करून दिलीत त्यासाठी सावित्री बाईना खूप कष्ट सोसावे लागले त्यांनी त्यासाठी खूप प्रयत्न केले, दगड व शेण अंगावर झेलले . पण त्यांनी हार मनाली. महिलानी शिकले पाहिजे त्यातच त्यांची प्रगती आहे ,महिलांच्या विकासाचा व साक्षमीकरणाचा पाया हा शिक्षण आहे आस मॅडम ने सांगितले. आज महिला बाहेर पडल्या असून शिक्षण घेत आहे व ह्याचे प्रमाण हे वाढताना दिसत असले तरी त्याचा गैरफायदा महिलानी घेऊ नये . महिलाना जे स्वातंत्र्य मिळाले आहे त्याचा त्यांनी स्वैराचार मांडू नयेऽ असे त्यांनी आपल्या व्याख्यानातून प्रतिपादित केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु.धनश्री सिदवाडकर हिने केले तर आभार प्रदर्शन कु.अर्चना हिने केले.

यावेळी सत्राचे अध्यक्ष डॉ.अब्दुलसमद शेख हे होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार, डॉ.वनिता साबळे, प्रा. गजानन फुलसावंगे उपस्थित .यावेळी जि.प.शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते व भिंदोन गावातील काही महिला उपस्थित होत्या.

**५) व्याख्याते :- डॉ. मथुरा मेवाड** ( देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद )

**विषय :- ग्राम व शहर विकासात युवकांची भूमिका :-**

दि.२२ /०१ /२०२३या रोजी देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथील मराठी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. मथुरा मेवाड यांनी ' ग्राम व शहर विकासात युवकांची भूमिका 'या विषयी व्याख्यान दिले त्यात त्यांनी ग्रामीण आणि शहराच्या विकासात युवकाची भूमिका खूप महत्वाची असते असे सांगितले . माणसाला जगण्यासाठी समाजाची अवश्यकता असते जर विकसित समाज असेल तर गाव व शहर पण विकसित होते. त्यासाठी युवक व युवतिनि शिक्षणावर भर देऊन स्वतची प्रगती करावी व आपल्या परिसराची पण प्रगती करावी .ग्रामीण भागातील युवक असो किंवा शहरातील युवक त्यांनी आपल्या भागाचा विकासात महत्वाची जबाबदारी उचलली पाहिजे एन.एस.एस. च्या माध्यमातून जगण्याची

कला ही खऱ्या अर्थाने मिळत असते. असेही त्यांनी प्रतिपादित केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु.श्वेता शिंदे हिने केले तर आभार प्रदर्शन कु.चैताली गडाख  हिने केले.

यावेळी सत्राचे अध्यक्ष डॉ. नरसिग देशमुख हे होते यावेळी प्राचार्य.रामकिशन दहिफळे कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार,डॉ.वनिता साबळे, ,प्रा गजानन फुलसावंगे , व भिंदोन गावातील  युवक व युवती उपस्थित होत्या.

**६) व्याख्याते डॉ. अर्चना काटकर** (कला  महाविद्यालय,बीडकिन ,औरंगाबाद .)

**विषय:-व्यक्तिमत्व विकास** :-

दि.२३/०१/२०२३ यादिवशी डॉ. अर्चना काटकर कला महाविद्यालय, बीडकिन, औरंगाबाद.यांनी अंधश्रद्धा निर्मुलन या विषयावर आपले व्याख्यान दिले . त्यात त्यांनी वाचनातून व्यक्तिमत्व विकास कसा घडून येतो याविषयी स्वयंसेविकांना तसेच भिंदोन येथील ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. शिक्षणामुळे मनुष्याचा सर्वांगीण विकास कशाप्रकारे घडू शकतो हे सुद्धा त्यांनी सांगितले . माणसामध्ये ज्ञानामुळे प्रगल्भता येते व त्यातूनच त्याचा सर्वांगीण विकास हा घडून येतो. शिक्षणामुळे माणसे जोडली जातात तसेच त्यामुळे तो विकसित होतो .पुढे त्यांनी असेही सांगितले की एन.एस.एस.च्या माध्यमातूनही व्यक्तिमत्व विकास हा घडून येतो. एन.एस.एस.च्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचे यथार्थ चित्रण बघायला मिळते.वेळेचे नियोजन,अभ्यासाचे नियोजन, कामांचे नियोजन,नीटनेटकेपणा,कसे रहावे,कसे वागावे सहनशीलता,रागावर नियंत्रण करण्याची क्षमता या एन.एस.एस.च्या माध्यमातून घडून येते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु.रीतु ठाकूर हिने केले तर आभार प्रदर्शन कु.ऋतूजा हिने केले.

यावेळी जि.प.शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक,शिक्षिका व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी सत्राचे अध्यक्ष डॉ.अब्दुल हसीब सिद्धीकी  हे होते.यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार,डॉ.वनिता साबळे ,प्रा. गजानन फुलसावंगे तसेच  भिंदोन गावातील काही  मुली व महिला उपस्थित होत्या.

**बौद्धिक सत्र** –

भिंदोन गावात संपन्न झालेल्या या विशेष शिबीरात स्वयंसेविकासाठी व गावाकरयांसाठी विविध सत्रांचे आयोजन एन.एस.एस. च्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते.

**१) निंबंधलेखन** :-

दि. २५/०२/२०१५ या दिवशी कार्यक्रमाधिकारी डॉ. पल्लवी भावसार व डॉ.वनिता साबळे,प्रा. गजानन फुलसावंगे ,डॉ. समद शेख  यांच्या मार्गदर्शनाखाली '**महिला सशक्तीकरण**' या विषयावर निंबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.महिला सबलीकरण हा निबंध महिलांच्या जिव्हाळ्याचा असल्याने स्वयंसेविकांनी तो अतिशय मनपूर्वक लिहिला.

**२).कवी संमेलन** :-

दि.२६/०२/२०१५ या दिवशी भिंदोन येथे कार्यक्रमाधिकारी डॉ. पल्लवी भावसार व डॉ.वनिता साबळे,प्रा . गजानन फुलसावंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कविता वाचन स्पर्धा पार पडली.यावेळी जास्तीत-जास्त स्वयंसेविका सहभागी झाल्या होत्या.त्यांनी वाचलेल्या कविता अतिशय मार्मिक व अर्थपूर्ण आणि मनाला भेदणाऱ्या होत्या.

**३) विविध गुणप्रदर्शन** :-

दि.२७/०२/२०१५ या दिवशी प्रा . गजानन फुलसावंगे यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.पल्लवी भावसार,डॉ.वनिता साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध गुणप्रदर्शन ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत स्वयंसेविकांच्या अंगी असलेल्या विविध गुणांचे गुणप्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली.

**४) शेला पागोटे :-**

दि.२७/०२/२०१५ या दिवशी कार्यक्रमाधिकारी डॉ. पल्लवी भावसार व डॉ.वनिता साबळे,प्रा. गजानन फुलसावंगे शेला पागोटे हा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी स्वयंसेवविकींनी प्राध्यापक/प्राध्यापिकांवर,मैत्रिणीवर जवळपास ५३ शेला पागोटे तयार केले होते .यात स्वयंसेविकांनी धमाल केली परंतु शेला पागोटे हे अर्थपूर्ण आणि मार्मिक होते या कार्यक्रमाचा प्राध्यापकांसह सर्व स्वयंसेवीकांनी मनसोक्त आनंद लुटला.

**५) क्रीडाविषयक मैदानी स्पर्धा :-**

भिंदोन येथील विशेष श्रम संस्कार शिबीरात श्रमदान,व्याख्याने,बौद्धिक सत्रे ,मनोरंजन विषयक कर्यक्रमाबरोबरच प्रा.गजानन फुलसावंगे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडाविषयक स्पर्धादेखील आयोजित करण्यात आल्या होत्या त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**कबड्डी व खो-खो :-**

दि.२७/०२/२०१५ रोजी मैदानी स्पर्धेत मुलींची संख्या ही २० होती यात कबड्डी व खो-खो चे दोन संघ होते १) सावित्रीबाई फुले संघ व दूसरा राष्ट्रमाता जिजाऊ संघ होते .

मुलींच्या मैदानी स्पर्धेत खो-खो चा विजेता संघ हा राष्ट्रमाता जिजाऊ संघ असून त्याची कर्णधार ही कु.रितू ठाकूर ही होती तर कबड्डी विजेता संघ हा सावित्रीबाई संघ असून त्याची कर्णधार ही कु माया कुमावत ही होती.

**विशेष श्रम संस्कार शिबीर समारोप – दि.०१/०३/२०१५ .**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई व जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला कला महाविद्यालय,औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय विशेष श्रम संस्कार शिबीर समारोप समारंभ दिनांक २४ /०१/२०२३ या दिवशी संपन्न झाला. या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. परवेज शेख लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद यांची उपस्थिती होती. या समारोप प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे,प्रशासकीय सदस्य मूसा सर , प्रा.जितेंद्र शेजवळ, कला महाविद्यालय बीडकिन चे मुंढे सर, जिल्हा परिषद शाळेचे मुख्य ध्यापक गणेश नलावडे,श्री राजेंद्र ठुबे , कार्यक्रमाधिकारी डॉ. पल्लवी भावसार डॉ. वनिता साबळे ,डॉ. साईनाथ बनसोडे ,प्रा. गजानन फुलसावंगे हे होते. प्रा.डॉ. परवेज शेख यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणात एन.एस.एस.च्या माध्यमातून जनसेवा घडून येते. समाजात आपण कसे कार्य करावे हे राष्ट्रीय सेवा योजनेतून शिकायला मिळते.ग्रामीण समाजाच्या विकासासाठी युवतींनी पुढाकार घ्यावा असेही त्यांनी प्रतिपादित केले.विशेष म्हणजे प्रत्येक कार्यात स्त्रिया ह्या पुरुषांच्या पुढे असल्याचे दिसून येते. स्त्री ही परिवाराचा प्रमुख आधारस्तंभ आहे.भरताला जर महासत्ता बनवायचे असेल तर ते नारी शक्तीशिवाय अशक्य आहे. त्यासाठी युवतींनी पुढाकार घेऊन काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. एन.एस.एस. चे विद्यार्थी जीवनातील स्थान स्पष्ट केले. एन.एस.एस. च्या माध्यमातून माणसे जोडण्याचे महान कार्य होते. विद्यार्थिनिंचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी एन.एस.एस.हा एक उत्तम उपाय असल्याचे त्यांनी नमूद केले.प्रमुख पाहुण्यांच्या व प्राचार्यांच्या हस्ते शिबीर काळातील स्वयंसेविकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी महिलांच्या सबलीकरणासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे सांगितले मुली ह्या देशाच्या प्रगतीचे मूळ आहे त्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणावर विशेष भर देण्याचे नमूद केले. समाजातील अज्ञान दूर करण्याचे कार्य हे मुली चांगल्या प्रकारे करू शकतात. या सात दिवशीय शिबीरात झालेल्या विविध कार्यांचा त्यांनी आढावा घेतला.व सहभागी कार्यक्रमाधिकारी,सहकार्यक्रमाधिकारी,सर्व सहभागी प्राध्यापक,प्राध्यापिका व ज्यांच्यासाठी हा उपक्रम होता त्या सर्व स्वयंसेविका या सर्वांचे त्यांनी कौतुक केले आणि अशाच प्रकारे समाजाची सेवा करण्याचे आवाहन ही केले.

शिबीर समारोप प्रसंगी या कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रमाधिकारी डॉ.पल्लवी भावसार यांनी केले व या सप्ताहात केलेल्या कामाचा तपशील थोडक्यात मांडला. या कार्यक्रम प्रसंगी सूत्रसंचालन डॉ. साईनाथ बनसोडे यांनी केले तर आभार प्रदर्शनाचे कार्य डॉ. वनिता साबळे यांनी केले. या समारोप समारंभ प्रसंगी प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे प्रा.जितेंद्र शेजवळ, ,डॉ.विठ्ठलसिंग घुनावत,डॉ.अनिस मिर्झा बेग,डॉ.परमेश्वर काकडे, डॉ.अ.समद शेख,कार्यक्रम अधिकारी डॉ. पल्लवी भावसार,डॉ. वनिता साबळे ,डॉ.नरसिंग देशमुख, प्रा.प्रकाश
काळवणे,डॉ.अबुल हसीब सिद्दीकी, तसेच भिंदोन गावातील ग्रामास्थांचा विशेष सहभाग होता.

---




दि . १८ /०१ २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक श्री. गुलाब शेख सर , प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. लियाकत शेख ,श्री गणेश नलावडे जि.प. प्रा. शाळा भिदोन , कुरणपिंपरी चे उपसरपंच मुजमील पटेल ,प्रा. जितेंद्र शेजवळ ,श्री राजेंद्र ठुबे ,अध्यक्ष प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे ,कार्यक्रम अधिकारी डॉ. पल्लवी भावसार,डॉ. वनिता साबळे.




प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.लियाकत शेख,लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.







अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे







उद्घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना महाविद्यालयाचे प्रा. गजानन फुलसावणे सर.




गावातून प्रभात फेरी काढताना राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका.






सत्राचे सूत्रसंचालन करताना कु. रितू ठाकूर व प्रमुख पाहुण्याचे स्वागत करताना कु. अंजली साळवे .




दि.१९/०१/२०२३ या दिवशी लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद येथील लोकप्रशासन विषयाचे प्राध्यापक डॉ. संतोष काकडे यांनी व्यसन मुक्ती व अंधश्रद्धा निर्मूलन वर आपले व्याख्यान दिले.




अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. जितेंद्र शेजवळ सर.




कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना कु. माया कुमावत.




दि.२०/०१/२०२३ या दिवशी युनिसेफ(युनाटेड नेशन्स चिलड्रेन्स फंड )चे सदस्य श्री विश्वनाथ कस्तुरे सर यांनी आरोग्य, स्वच्छता, व योग्य पद्धतीने वृक्षारोपण कसे करायचे याचे मार्गदर्शन




वृक्षारोपण करताना श्री विश्वनाथ कस्तुरे सर, डॉ. वनिता साबळे प्रा. गजानन फुलसावंगे व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका.




परिसर स्वच्छता करताना राष्ट्रीय सेवा योजना च्या स्वयंसेविका.






बौद्धिक सत्रामध्ये जि. प्र. उ. प्रा. शाळेच्या शिक्षिका श्रीमती मीनाक्षी राऊत यांनी आपल्या व्याख्यानातून आरोग्यदायी जीवनासाठी योग व आहार कसा असावा हे सांगितले.




अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे हिन्दी विभाग प्रमुख डॉ. अनिस मिर्झा सर




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना कु. धनश्री शिदवाडकर




कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन करताना कु. विभाली भावसार




दि.२१/०१/२०२३ या दिवशी राजश्री शाहू महाविद्यालय, वाळूज, औरंगाबाद येथील प्रा डॉ. प्राजकती वाघ यांनी महिला सबलीकरण विषयी आपले व्याख्यान देतांना.




अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. संमद शेख सर




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना कु. योगेश्वरी भांडे




दि.२२/०१/२०२३ या रोजी देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथील मराठी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. मथुरा मेवाड यांनी 'ग्राम व शहर विकासात युवकांची भूमिका' या विषयी व्याख्यान देताना.




अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागाचे डॉ. नरसिंग देशमुख स




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना कु. ऋतूजा मेहूणकर




दि.२३/०१/२०२३ यादिवशी डॉ. अर्चना काटकर कला महाविद्यालय, बीडकिन, औरंगाबाद. यांनी अंधश्रद्धा निर्मुलन या विषयावर आपले व्याख्यान देताना.




अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे इंग्लिश विभागाचे डॉ. सिदिकी सर







राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविकानी अंगणवाडील भेट दिली.




स्वागत गीत सादर करताना राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका.




समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित प्रा.डॉ. परवेज शेख लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविकाना मार्गदर्शन करताना.





अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे

# भिंदोन येथे 'रासेयो'चे श्रमदान शिबीर




**औरंगाबाद :** येथील महिला कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमदान शिबिराचे भिंदोन (ता.औरंगाबाद) येथे आयोजन करण्यात आले आहे.

या सात दिवसीय विशेष श्रमदान शिबिराचे उद्घाटन १८ जानेवारी रोजी मॉडर्न कन्या विद्यालयाचे शिक्षक गुलाब शेख यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य लियाकत शेख, मुख्याध्यापक गणेश नलावडे, कुरण पिंप्रीचे उपसरपंच मुजमील पटेल, राजेंद्र ठुबे, डॉ.पल्लवी भावसार, डॉ. वनिता साबळे यांची उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात गुलाब शेख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व प्रतिपादीत केले. युवकांमध्ये सामाजिक संस्कार, सेवाभाव रूजण्यासाठी रासेयो शिबिर उपयोगाचे ठरते असे ते म्हणाले. डॉ. लियाकत शेख यांनी मार्गदर्शनात सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंतचा वेळ टी.व्ही. व मोबाईलपासून दूर राहून आपल्या स्वतःच्या विकासाकरीता द्यावा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे यांनी विकासाची सुरुवात ही स्वतःपासून व गावापासून करावी असे सांगितले. प्रास्तविक डॉ.पल्लवी भावसार यांनी तर सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. वनिता साबळे यांनी केले. प्रा.गजानन फुलसावंगे यांनी आभार मानले.